## निशाणी १२ खालील आदेश

वादी यांनी सदरचा दावा कायमचा मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यात वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सर्वे नं.५३/४ मधील प्लॉट क्र.१४, पूर्व पश्चिम ४० फुट व दक्षिणोत्तर ३० फुट दाव्यात नमुद चतुःसिमाप्रमाणे तडजोड झाली आहे. वादी यांनी दाखल केलेल्या **नि.क्र.१२** कडील तडजोड पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी दि.०५/०५/२०२३ रोजीच्या ठरावपत्रानुसार वादी यांना पंचांसमक्ष दावामिळकत दिलेली आहे. सदरच्या दाव्यात वादी यांनी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. वादी यांनी दाखल केलेल्या ठराव पत्रानुसार दावा मिळकतीचा ताबा वादी यांना देण्यात आलेला आहे. परंतु, वादी यांनी त्यांची मालकी दर्शविणारे कोणतेही कागदपत्र सदरच्या दाव्यात दाखल केले नाही. बऱ्याच न्यायनिर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने व मा.उच्च न्यायालयाने मनाई हुकूमाचा आदेश करतेवेळीस वादी हे कब्जेवहिवाटीस असणे गरजेचे आहे व त्याबाबची मालकी दर्शविणारे कागदपत्र वादीच्या नावे असणे गरजेचे आहे असे निर्देश दिलेले आहेत. मात्र ठरावपत्राआधारे वादी यांची मालकी शाबीत होत नाही. वादी यांनी दाखल केलेले ठरावपत्र हे नोंदणीकृत नाही. मालमत्ता हस्तांतरण कायद्या अंतर्गत स्थावर मालमत्ता ज्याची किंमत १०० रुपयांपेक्षा जास्त

असते त्याला नियमाप्रमाणे नोंदणीकृत दस्त करणे गरजेचे असते. परंतु, वादी यांनी ठराव पत्राची नोंदणीकृत दस्त करून घेतली नाही. म्हणून वादी यांची **नि.क्र.१२** कडे दाखल तडजोड <u>नामंजूर</u> करण्यात येते.

Digitally signed by JYOTIMALA C GUPTA
Date: 2024.08.05 17:38:58 +0530

**( श्रीमती जे.सी.गुप्ता )**

**दि.: ०५/०८/२०२४** **दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर**